**मे. मुळा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं.८४८ ते ८६५, ८६७ ते ८७२, मुक्काम पोस्ट – सोनई, तालुका-नेवासा, जिल्हा –अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाची क्षमता ४५.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिन विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत.**

-------------

संदर्भः- १) भारत सरकार, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९

२) भारत सरकार, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयचे निर्देश दिनांक १४-०९-२०२०.

३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ चे पत्र क्र. बी-२००९१७-एफटीएस-००८२, दिनांक १७-०९-२०२०

४) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई चे पत्र दिनांक ०३-१२-२०१९.

मे. मुळा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं. ८४८ ते ८६५, ८६७ ते ८७२, मुक्काम पोस्ट -- सोनई, तालुका-नेवासा, जिल्हा – अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाची क्षमता ४५.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिन विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी वार – शुक्रवार, दिनांक १९ मार्च, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती .

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-२१,व्दारा पत्र क्रं/बीओ.जेडी/पीएच/डब्लुपीसी/बी-२१०२२४-एफटीएस-०१८७दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर किंवा त्यांचे प्रतिनिधी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - सदस्य

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर - आयोजक

ADM

श्री संजीव रेदासनी, प्रभारी, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अहमदनगर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (संदर्भ क्रं. २ वरिलप्रमाणे) व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई (संदर्भ क्रं. ३ वरिलप्रमाणे) दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Physical Public Hearing) आयोजित करण्यात आलेली असून बैठकीच्या सत्रात ५० व्यक्तींना परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास व्यक्तींना पुढील सत्रात बैठकीत संधीदेण्यात येईल. सर्व उपस्थितांना जनसुनावणीत सहभागाची संधि देण्यात येईल असे सांगितले. त्यांनी उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना केली. त्यानुसार, प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे, सॅनिटायझरचा वापर सभागृहात प्रवेश करताना करण्यात आलेला आहे. बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

आयोजक, यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी श्री संदिप निचित, अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. पी. एम. जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण प्रेमी, स्वयंसेवी संघटना व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले व अध्यक्षांच्या परवाणगीने प्रस्तावणा विषद केली.

आयोजक,पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री. रेदासनी यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना प्रकल्प प्रवर्तक मेसर्स मुळा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं. ८४८ ते ८६५, ८६७ ते ८७२, मुक्काम पोस्ट – सोनई, तालुका-नेवासा, जिल्हा –अहमदनगर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित मळीवर आधारित आसवणी प्रकल्पाची क्षमता ४५.० किलोलिटर प्रतिदिन पासून १००.० किलोलिटर प्रतिदिन विस्तारिकरण संदर्भातपर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला .

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्यापर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी मागितली व सदरहू विभागाने दिनांक ०४-०१-२०२१ रोजी त्यास मान्यता (अटी व शर्ती –Terms of Reference) देण्यात आली.

सदरहू जनसुनावणी ही आज दिनांक १९-०३-२०२१ रोजी आयोजित करण्यास जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी मान्यता दिलेलीआहे, त्यानुसार पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात इंग्रजीत दिनांक १३-०२-२०२१ रोजी मराठी व इंग्रजीत पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते .

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचापर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रतशासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये ठेवणयात आली.

ADM

आयोजक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाबाबत एकही सूचना वा आक्षेप स्थानिक म.प्र.नि.मंडळ कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. श्री रेदासनी यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती अध्यक्षांना केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पा विषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजने विषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या ईआयए अधिसूचनेनुसार प्रस्तावित प्रकल्प हा अ ५ (जी) संवर्गात वर्गीकृत आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून सदरहू प्रकल्प विस्तारीकरणामुळे आसवणी प्रकल्पात ४७ लोकांची आवश्यकता आहे. त्यांनी प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेची माहिती सादरीकरणात दिली.

सादरी करणानंतर पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक /प्रकल्प सल्लागार/पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-

१) श्री विठ्ठल बाबूराव शिंदे, राहणार-खरवंडी, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-

सादरीकरण चांगले दाखविले. मात्र सदरहू प्रकल्प विस्तारीकरणाचा शेतक-यांना काय फायदा होईल याबाबत माहिती द्यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की प्रकल्प प्रवर्तक आसवणी प्रकल्पाचे ४५.० किलोलिटर प्रती दिनाचे १००.० किलोलिटर प्रती दिन पर्यंत विस्तारिकरण करणार आहेत. केंद्र सरकारने काही नविन धोरण जाहिर केलेले आहे. यात पेट्रोलमध्ये इथेनॉल एकत्रित करायचे आहे. आता ५% करण्याचा प्रस्ताव आहे. पुढे ते २०२५ सालापर्यत १०% करण्याचा प्रस्ताव आहे. साखर कारखान्यातून मिळणा-या मळीपासून आपण रेक्टीफाईड स्पिरिट, इथेनॉल यांची निर्मिती केली व त्याच्या विक्रीमुळे कारखान्यास अतिरिक्त पैसे मिळतील. त्यामुळे शेतक-यांना त्यांच्या ऊसाला जास्त भाव देता येईल. विस्तारिकरणासाठी आपण मळी आणि ऊसाचा रसही इथेनॉल निर्मितीसाठी वापरणार आहोत. त्यामुळे ऊसाचा दरही उंचावेल व शेतक-यांचा फायदाच होईल.

२) श्री उद्दव भानुदास तांदळे, राहणार-गणेशवाडी, तालुका- नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-

हा प्रकल्प जरी शेतक-यांच्या फायद्याचा असला, तरी या प्रकल्पास दैनंदिन अतिरिक्त पाणी किती लागेल? त्यासाठी आपण शासनाची परवानगी घेतली आहे काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सद्या कार्यरत आसवणी प्रकल्पासाठी ३०९.० घनमीटर प्रतिदिन एवढे पाणी लागते. विस्तारिकरण झाल्यानंतर ८३५.० घनमीटर पाण्याची गरज भासेल. त्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी पाटबंधारे विभागाची परवानगी घेतलेली आहे.

३) श्री प्रसाद हरकळे, राहणार-सोनई, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-

आसवणी प्रकल्पाचा विस्तार हा शेतक-यांच्या हितासाठी आहे याबाबत काहीही शंका नाही. तरीही प्रकल्पाच्या विस्तारिकरणासाठी एकंदरीत किती खर्च येणार आहे?

ADM

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge) प्रकल्प आहे. यात आसवणी, बॉयलर, एमईई आणि सीपीयु (कन्डेन्सिंग पॉलिशिंग युनिट) यासाठी जवळजवळ ८२.५४ कोटी एवढा खर्च येईल.

४) श्री बाळासाहेब तुकाराम सोनवणे, राहणार-हिंगोणी, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-

सदरहू विस्तारिकरण प्रकल्प किती दिवसात पूर्ण होईल?

यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदरहू प्रश्नाचे उत्तर प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक किंवा मुख्य अभियंता यांनी द्यावे असे सूचविले. प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक यांनी उत्तर दिले की आधुनिकरण व विस्तारिकरणाचा विचार करुन हा प्रकल्प साधारणतः १२ महिन्यात पूर्ण होईल.

५) श्री दत्तात्रय मिठू निमसे, राहणार-सोनई, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-

आज आसवणी प्रकल्प विस्तारिकरण ४५.० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेपासून १००.० किलोलिटर प्रतिदिन क्षमतेपर्यंत करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. हे आमच्या तालुक्याला निश्चितच भूषणावह बाब आहे. तरी प्रकल्प पूर्ण झाल्यावर हवेचे प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी आपण काय उपाययोजना केलेली आहे?

ह्या विस्तारीकरण प्रकल्पामुळे हवेचे प्रदूषण होऊ नये म्हणून नविन बॉयलर बसविणार आहोत. प्रस्तावित बॉयलर हा २२.० टीपीएच क्षमतेचा असून त्यास इंधन म्हणून बगॅस व कोळसा जाळणार आहोत. हवेचे प्रदूषण होऊ नये म्हणून २२.० टीपीएच बॉयलरला ७५.० मीटर्सची चिमणी बसविणार आहोत. त्यास ईएसपी (इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर) ही हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांप्रमाणेच उत्सर्जन होईल याची काळजी घेण्यात येईल.

आयोजक व सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की कार्यान्वित बॉयलरला काय लावले याचा उल्लेख सादरीकरणात करण्यात आलेला नाही. त्यावेळी प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक यांनी उत्तर दिले की प्रकल्पात कार्यरतदोन्ही बॉयलरला ईएसपी हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित असून नविन बॉयलरलाही ईएसपी बसविण्यात येईल. यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री निमसे यांना प्रकल्प प्रवर्तकांनी आपले समाधान केलेले आहे असे मत मांडले.

६) श्री विकास नानासाहेब बानकर, राहणार-शनीशिंगणापूर, तालुका-नेवासा, जिल्हा-अहमदनगरः-

विस्तारिकरण प्रकल्पात उत्पन्न होणा-या स्पेंट वॉशवर प्रक्रियेसाठी प्रकल्प अधिकारी अत्याधुनिक सयंत्रणा वापरणार आहेत. तर त्यापासून शेतक-यांना कंपोस्ट खत मिळेल काय?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की विस्तारिकरण प्रकल्पात आपण कंपोस्टिंग करणार नाहीत. मात्र कार्यरत प्रकल्पात कंपोस्टींग निर्मिती चालू राहणार आहे. त्यामुळे शेतक-यांना कंपोस्टींग मिळेल.

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी आपण दोन्ही चालू ठेवणार काय या प्रश्नास पर्यावरण सल्लागार यांनी होकारार्थी उत्तर दिले. जुन्या आसवणी प्रकल्पात

ADP

कंपोस्टींग व नविन आसवणी प्रकल्पात इन्सिनरेशन असे चालू राहिल. त्यावेळी सदस्य यांनी नविन ५५.० केएलपीडीत इन्सिनरेशन करणार, कंपोस्टींग करणार नाही काय या मतास होकारार्थी उत्तरदिले.

७) त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीकिती कंपोस्टींग करणार याबाबत माहिती देण्याची सूचना केली आणि पूर्वी संमंत केलेल्या पर्यावरण अनुमतीतील निर्देश सांगण्याची सूचना केली. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीसिझनमध्ये करणार तर ऑफ सिझनमध्ये काय करणार याबाबत विचारणा केली.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की जुना ४५ केएलपीडी प्रकल्प हा फक्त २७० दिवसच कार्यान्वित राहिल. तर नविन ५५ केएलपीडी प्रकल्प हा ३०० दिवस चालेल. सदस्य,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीपावसाळ्यात कंपोस्टींगला परवानगी नाही अशी माहिती दिली.

यावेळी आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी याबाबत स्पष्टता असण्याचा विचार व्यक्त केला व ४५ केएलपीडीचे उत्पादन व प्रक्रिया वेगळी व ५५ केएलपीडीचे उत्पादन व प्रक्रिया वेगळी अशी विचारणा केली असता दोन्हीचे उत्पादन वेगळे व प्रक्रियाही वेगळी असे सांगण्यात आले. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ४५ केएलपीडी २७० दिवस तर ५५ केएलपीडी ३०० दिवस कार्यरत राहिल काय यास पर्यावरण सल्लागार यांना होकार्थी उत्तर दिले.

त्यावेळी सदस्य,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पुर्वीच्या पर्यावरण अनुमतीतील निर्देश वाचण्यास सांगितले. पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पूर्वीच्या पर्यावरण अनुमतीमध्ये बायोमिथिनायझेशन फॉलोड बाय एमईई फॉलोड बाय कंपोस्टींग असे निर्देश/प्रक्रिया आहे. सदस्य यांनी बॉयलर कोणार यास थरमॅक्सचा बॉयलर कार्यान्वित करणार असल्याचे उत्तर देण्यात आले.

८) डॉ. पी. एम. जोशी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-

सादरीकरणात वासाच्या दुर्गंधीबाबत (Odour Nuisance) काहीही उल्लेख नाही. त्याचा काही अभ्यास केलेला आहे काय?मळीचा वास येतो. टीओआरमध्ये वासाच्या दुर्गंधीबाबत (Odour Nuisance) विशेष निर्देश (Specific Condition) देण्यात आलेले आहेत, त्याबाबत स्पष्टीकरण करावे.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात बंद व्यवस्था (Closed System) आहे. त्याचप्रमाणे स्पेंट वॉश साठवण (storage) हे पाच दिवसांचे आहे. त्यास एसडीपीई लाईनिंग व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निर्देशांप्रमाणे स्पेंट वॉशची साठवण ही फक्त पाच दिवसांची आहे. पूर्वीसारखे तीस दिवसांचे नाही. कमाल पाच दिवसांचीच साठवण टाकी आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी कार्यरत ४५ केएलपीडी बाबत वासाच्या दुर्गंधीबाबत (Odour Nuisance) विचारणा केली व टीओआरमध्ये कृती योजना (Action Plan) बनविण्याचे निर्देश असून कृती योजना (Action Plan)बनविला काय याबाबत

ADM

विचारणा केली. कृती योजना (Action Plan)नसेल बनविला तर अभ्यास करुन बनविण्याची सूचना केली.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीध्वनी प्रदूषणाबाबत कामगारांनी इअर प्लग्ज दिले जातील एवढेच सांगितले आहे. पण बॉयलरजवळ काम करणा-या कामगारांबाबत काय याचा उल्लेख नाही. कालांतराने ते कामगार बहिरे होतात.कारण त्यांना ९० डीबीच्या वर आवाज येत असतो. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालातील पान नं. १८९ वरिल उल्लेख केला. सदस्य यांनी सांगितले की अहवालात “The details study should be conducted” असे लिहिलेले आहे. तर तो कोणी करायचा हे दिले नाही. तो तुम्ही करायला पाहिजे. कारण प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण सल्लागार यांना काम दिलेले आहे, म्हणून पर्यावरण सल्लागार यांनी ध्वनि प्रदूषणाबाबत अभ्यास करायला पाहिजे होता. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ध्वनी प्रदूषणाबाबत पर्यावरण सल्लागार यांनी अभ्यास करावा अशी सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या काही सूचना, आक्षेप वा टीकाटिप्पणी असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ. नाशिक तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अत्यंत रास्त मुद्दे उपस्थित केलेले आहेत असे मत मांडले. बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मुळा सहकारी साखर कारखाना लिमिटेड आसवणी प्रकल्पाची क्षमता ४५.० केएलपीडी वरुन १००.० केएलपीडी विस्तारिकरणाचा जो मानस आहे, त्यासाठी त्यांना राज्य शासनाने टीओआर मंजूर केलेला असून शासनाच्या ऑगस्ट,२००६ च्या अधिसूचनेनुसार प्रकल्पबाधित लोकांसाठी जनसुनावणी घेण्याचे आदेश आहेत, त्यास अध्यक्ष या नात्याने मी उपस्थित आहे. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी जरी सादरीकरण केलेले असले तरी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेले मुद्दे, सूचना याची अंतिम पर्यावरण अहवालातनोंद घेणे गरजेचे आहेत. तरी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित केलेल्या सूचना व प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार यांची निरिक्षणे अंतिम पर्यावरण अहवालात नोंदवावीत. जनसुनावणी बैठकीत पंचक्रोशीच्या नागरिकांनी उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांना उत्तरे कारखान्याच्या कार्यकारी संचालक, पर्यावरण सल्लागार यांनी दिलेली आहेत. तरी स्थानिकांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास लेखी स्वरुपात सादर करण्यात याव्यात. त्यांनी कारखाना व्यवस्थापनास सूचना केली की प्रकल्प विस्तारिकरणामुळे परिसरातील हवा, पाणी, जमिन व उभी पिके यावर जे काही परिणाम, जे दृष्य वा अदृष्य असोत, त्यासाठी अत्याधुनिक उपाययोजना करण्यात याव्यात. कारण हा कारखाना जुना असून लोकांच्या विश्वासास पात्र ठरलेला आहे. त्यास व्यवसायाची जोडही चांगली आहे. शेतक-याला त्याचा योग्य भाव देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे प्रगती होताना पर्यावरणावरही कोणताही दुष्परिणाम होणार नाही यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी काळजी घेण्याची गरज आहे. पर्यावरण सल्लागार यांनी १०कि.मी. परिघातील गावांमध्ये पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल मराठीत दिलेला असेल अशी माझी धारणा आहे. कोविडमुळे काही लोकांना येथे येणे शक्य झाले नसले तरीही त्यांनीलेखी

काही सूचना केल्यास त्यास पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर द्यावीत. त्यांनी उपस्थितांना त्यांच्याकाही सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृत्ता समावेश करण्यात येईल. ते इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करुन अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, मुंबई येथे सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल. त्यांनी जनसुनावणीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीयांनी बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप याची नोंद पर्यावरण सल्लागार यांनी अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात घेण्याची सूचना केली. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

(संजीव रेदासनी),
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी
समिती
तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ
अहमदनगर,

(डॉ. पी. एम. जोशी),
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ ,नाशिक

(संदीप निचित),
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,
जिल्हा- अहमदनगर